मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# चिंचवड विधानसभा मतदारसंघात चौरंगी लढत?..

## यंदाही राहुल कलाटे नावाचं वादळ घोंघावणार.. : अजित पवार गटाचे नाना काटे, भाऊसाहेब भोईर यांचीही बंडखोरी..



**पिंपरी | प्रतिनिधी**

विलक्षण नाट्यमय घडामोडी, नेत्यांचे धक्कातंत्र आणि अनाकलनीय राजकीय डावपेचांचा इतिहास असलेल्या चिंचवड विधानसभा मतदारसंघात यंदाही राहुल कलाटे नावाचं वादळ चिंचवड विधानसभेच्या रिंगणा त असणार आहेत. त्यांना अनपेक्षितपणे राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाकडून उमेदवारी जाहीर झाली आहे. तर, पोटनिवडणुकीतील पराभूत उमेदवार नाना काटे यांनी अपक्ष लढण्याचा चंग बांधला आहे. त्यामुळे या मतदार संघात पोटनिवडणुकीचीच पुनरावृत्ती होणार आहे. तर, दुसरीकडे अजित पवार गटाचे भाऊसाहेब भोईर हे देखील अपक्ष अर्ज भरून आपले नशीब आजमावणार आहेत. महायुतीतील जागावाटपाच्या फॉर्म्युल्यानुसार ही जागा भाजपला गेली आहे. शंकर जगताप हे भाजपचे उमेदवार आहेत.

मत विभाजनाची काटामारी आणि सोयीस्कर कोलांटउड्यांत माहीर असलेल्या कलाटेंना महाविकास आघाडीच्या वरिष्ठ नेत्यांचा विरोध होता. त्यामुळे ते यंदाही अदृश्य शक्तीच्या इशाऱ्यावर अपक्ष म्हणून अर्ज भरतील, असे चित्र होते. मात्र, घडले विलक्षणच. पिंपरी-चिंचवड शहरात राजकीय नेत्यांच्या कोलांटउड्या आणि सोयीस्कर पक्ष बदलण्याची भूमिका नेहमीच पाहायला मिळते. लाखांवर मतदार असून, गेली पंधरा वर्षे जगताप परिवाराचे निर्विवाद वर्चस्व राहिले आहे. लक्ष्मण जगताप यांनी सलग तीन वेळा बाजी मारली, तर त्यांच्या निधनानंतर २०२३ मधील पोटनिवडणुकीत त्यांच्या पत्नी अश्विनी जगताप निवडून आल्या. आता लक्ष्मण जगताप यांचे बंधू तथा भाजपचे शहराध्यक्ष शंकर जगताप यांची उमेदवारी निश्चित झाली आहे. सुरुवातीपासून लक्ष्मण जगताप यांच्यासोबत असलेल्या राहुल कलाटेंनी २००९ मधील विधानसभा निवडणुकीनंतर त्यांच्याशी फारकत घेतली. २०१४, २०१९, २०२३ या तिन्ही निवडणुकांत ते जगताप घराण्याच्या विरोधात निवडणुकीत उतरले. मात्र, तिन्ही वेळा त्यांना अस्मान दाखवले गेले.

(उर्वरित पान २ वर )

### आतापर्यंतच्या लढतींत काय झाले?

» विधानसभेच्या २०१४ मधील लढतीत भाजपच्या लक्ष्मण जगतापांनी १ लाख २३ हजार, तर शिवसेनेच्या कलाटेंनी ६३ हजार आणि राष्ट्रवादीच्या नाना काटेंनी ४२ हजार मते घेतली होती. तेव्हाच्या अपक्ष मोरेश्वर भोंडवेंनी १४ हजार मते खाल्ली होती. २०१९ मध्ये राष्ट्रवादी पुरस्कृत कलाटेंनी १ लाख १२ मते पदरात पाडून घेतली होती.

» २०२३ च्या पोटनिवडणुकीत राष्ट्रवादीकडून नाना काटे आणि राहुल कलाटे इच्छुक होते. शेवटच्या क्षणी काटेंना उमेदवारी मिळाली. त्यांनी ९९ हजार मते घेतली, तर ऐनवेळी अपक्ष म्हणून उतरलेल्या कलाटेंचा टक्का घसरला. त्यांना ४४ हजार मतांवर समाधान मानावे लागले. आता काटे आणि कलाटे पुन्हा आमने सामने आहेत. फरक फक्त भाजपच्या उमेदवारीचा आहेत. त्यावेळी आ. अश्विनी जगताप समोर होत्या आता भाजपचे शहराध्यक्ष शंकर जगताप आमने सामने आहेत. त्यात आता भाऊसाहेब भोईर यांनीही उडी घेतली आहे.

---

# भोसरी विधानसभेतून महाविकास आघाडीतर्फे अजित गव्हाणे सोमवारी अर्ज दाखल करणार

## परिवर्तनाच्या लढाईमध्ये सहभागी व्हा; अजित गव्हाणे यांचे आवाहन



**पिंपरी | प्रतिनिधी**

महाविकास आघाडीचे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अधिकृत उमेदवार अजित गव्हाणे सोमवारी ( दि 28 ) उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत. तत्पूर्वी ते ग्रामदैवत भैरवनाथ तसेच छत्रपती शिवाजी महाराजांचे दर्शन घेऊन उमेदवारी अर्ज दाखल करतील यावेळी कार्यकर्त्यांचे मोठे शक्ती प्रदर्शन देखील होणार आहेत.

गेल्या अनेक दिवसांपासून भोसरी मतदारसंघांमध्ये परिवर्तनाची लढाई स्थायी समितीचे माजी अध्यक्ष अजित गव्हाणे तसेच आजी-माजी पदाधिकारी, माजी नगरसेवक, ग्रामस्थ यांनी सुरू केली आहे. भोसरी मतदारसंघात वाढलेली दादागिरी, दहशतवाद, भ्रष्टाचार यांना पायबंद घालण्यासाठी नैतिकतेची ही लढाई असल्याचे अजित गव्हाणे यांनी स्पष्ट केले आहे.

भोसरी मतदारसंघांमध्ये विकास कामांचा केवळ दिखावा करण्यात येत आहे. गेल्या दहा वर्षांपासून अनेक रस्ते प्रलंबित आहे. या विधानसभा मतदारसंघाला रस्त्यांची कनेक्टिव्हिटी अद्यापही मिळाली नसल्याने अनेक ठिकाणी नागरिकांचा वेळ आणि पैसा खर्च होत आहे. मनमानी कारभार, पदाधिकारी व नगरसेवक यांच्या कामात लुडबुड, प्रशासकीय कामात हस्तक्षेप या प्रकारांना सर्वच नाराज आहेत. ही नाराजी परिवर्तनामध्ये बदलणार आहे. या बदलासाठी नागरिक तयार असून येत्या 20 नोव्हेंबर रोजी मतपेटीतून नागरिक आपली नाराजी व्यक्त करतील असा विश्वास अजित गव्हाणे यांनी व्यक्त केला आहे.

### परिवर्तनासाठी एकत्र या, बहुसंख्येने या!

» भोसरी विधानसभा मतदारसंघासाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने अजित गव्हाणे सकाळी नऊ वाजता ग्रामदैवत भैरवनाथाचे दर्शन घेतील. त्यानंतर छत्रपती शिवाजी महाराजांचा आशीर्वाद घेणार आहेत. तत्पूर्वी लांडेवाडी ते पीएमटी चौक या दरम्यान कार्यकर्त्यांसोबत अजित गव्हाणे पदयात्रा करणार आहेत. त्यानंतर अर्ज भरण्यासाठी गव्हाणे रवाना होणार आहेत.

---

# महायुती एकदिलाने निवडणुकीला सामोरे जाणार : खा. श्रीरंग बारणे

## जगताप, बनसोडे सोमवारी अर्ज भरणार तर महेश लांडगे मंगळवारी अर्ज भरणार



**पिंपरी | प्रतिनिधी**

राज्यामध्ये मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजितदादा पवार यांच्या नेतृत्वाखाली महायुती सरकारने लोकाभिमुख निर्णय घेतले आहेत. त्यामुळे विकासात्मक मुद्दे घेऊन विधानसभा निवडणुकीला महायुती एकजुटीने सामोरे जात आहे. जनता महायुतीच्या मागे आहे. पिंपरी चिंचवड शहरासाठी मेट्रो, पाणी, रस्ते असे अनेक प्रश्न महायुतीने मिटवले आहेत. आम्ही सर्वजण एकत्र असून एकदिलाने निवडणुका लढून जिंकणार असल्याचा निर्धार खासदार श्रीरंग आप्पा बारणे यांनी पत्रकार परिषदेत व्यक्त केला.

महायुती व इतर घटक पक्ष यांच्या वतीने रविवारी चिंचवड विधानसभेचे उमेदवार व भाजप शहराध्यक्ष शंकर जगताप, पिंपरी विधानसभेचे उमेदवार, आमदार अण्णा बनसोडे आणि भोसरी विधानसभेचे उमेदवार आमदार महेशदादा लांडगे यांचे प्रतिनिधी कार्तिक लांडगे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे शहराध्यक्ष योगेश बहल, आमदार अश्विनी जगताप, उमाताई खापरे, माजी खासदार अमर साबळे, प्राधिकरणाचे माजी अध्यक्ष सदाशिव खाडे आदींसह महायुतीतील घटक पक्षाचे पदाधिकारी, प्रमुख कार्यकर्ते उपस्थित होते.

योगेश बहल यांनी सांगितले की, पिंपरी विधानसभेतून आमदार अण्णा बनसोडे यांची अधिकृत उमेदवारी जाहीर झाली आहे. या ठिकाणी इच्छुक असणाऱ्या इतर व्यक्तींची नाराजी दूर करून अण्णा बनसोडे यांच्यासह महायुतीतील चिंचवड विधानसभेचे उमेदवार शंकर जगताप, भोसरी उमेदवार आमदार महेशदादा लांडगे या तीनही उमेदवारांना भरघोस मतांनी निवडून आणण्याचा निर्धार नागरिकांनी केला आहे.

चिंचवड विधानसभेचे उमेदवार व भाजप शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी सांगितले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे विकसित भारताचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी जास्तीत जास्त उमेदवार राज्यातून आणि शहरातील तीनही उमेदवार निवडून आणण्यासाठी भाजप सह सर्व घटक पक्ष एकत्रित काम करीत आहेत. त्याला त्या सरकारच्या नेतृत्वाखाली सुरू असलेली विकासाची गंगा आणि वेग आणखी वाढवण्याचे व्हिजन आहे. पिंपरी चिंचवड शहराचे नाव देशातच नव्हे तर जगात उंचावण्यासाठी आम्ही सर्व प्रयत्नशील आहोत, यासाठी जनता आमच्या पाठीशी आहे असा विश्वास शंकर जगताप यांनी व्यक्त केला.

सदाशिव खाडे यांनी सांगितले की, चिंचवड विधानसभेचे उमेदवार व भाजप शहराध्यक्ष शंकर जगताप आणि पिंपरी विधानसभेचे उमेदवार आमदार अण्णा बनसोडे सोमवारी तर भोसरी विधानसभेचे आमदार व उमेदवार महेशदादा लांडगे मंगळवारी अर्ज भरणार आहेत अशी माहिती खाडे यांनी यावेळी दिली.

# पुणे महापालिकेची नोकरी नकोच

## महापालिकेच्या तब्बल 71 कर्मचाऱ्यांनी गेल्या वर्षभरात नोकरी सोडल्याचे समोर आले आहे

**पुणे | प्रतिनिधी**

महापालिकेच्या तब्बल ७१ कर्मचाऱ्यांनी गेल्या वर्षभरात नोकरी सोडल्याचे समोर आले आहे. वाढते नागरीकरण, कामाचा व्याप, शासकीय कामकाजाची बदलती कार्यपद्धती यामुळे आरोग्य तसेच मानसिक ताण वाढत असल्याचे सांगत अनेकांनी नोकरी सोडली आहे.

तर, जुन्यांपैकी १३ कर्मचाऱ्यांनी निवृत्तीआधीच व्हीआरएस घेतली आहे. हे प्रमाण पाहता प्रत्येक पाच दिवसाला एक कर्मचारी पालिकेला रामराम करीत असल्याचे चित्र आहे. पुणे महापालिकेत गेल्या दहा ते बारा वर्षे न्यायालयीन वाद तसेच सेवा प्रवेश नियमावली अंतिम नसल्याने नवीन नोकरभरती झालेली नव्हती. या कालावधीत मोठ्या प्रमाणात कर्मचारी सेवानिवृत्त झाले. त्यामुळे कंत्राटी सेवकांच्या माध्यमातून कामे होत होती.



### स्पर्धा परिक्षांचे सर्वाधिक उमेदवार...

» महापालिकेच्या कामाचा राजीनामा देणाऱ्या कर्मचारी बहुतांश तरूण हे स्पर्धा परिक्षेची तयारी करणारे आहेत. त्यामुळे अनेकांनी इतर शासकीय विभागांचीही परिक्षा दिलेली होती. त्यामुळे मोठ्या शासकीय पदावर नियुक्ती होत असल्याने अनेकांकडून आपल्या पदाचा राजीनामा दिला जात आहे.

मात्र, शासनाने भरतीवरील स्थगिति उठविल्यानंतर या महापालिकेने २०२२ मध्ये १३५ कनिष्ठ अभियंत्यांसह विविध पदांच्या ४४८ जागांची भरती प्रक्रिया पार पाडली. त्यानंतर आता दुसऱ्या टप्प्यात ९ पदांवरील ३२० जागांची भरती प्रक्रिया पूर्ण केली. यात दोन टप्प्यात आत्तापर्यंत ८०८ पदांची भरती केली. यातील लिपिक, कनिष्ठ अभियंता, फायरमन, सहाय्यक अतिक्रमण निरीक्षक, विभागीय वैद्यकीय अधिकारी यासह अन्य काही पदावरील अधिकाऱ्यांनी राजीनामा दिल्याने ७१ जागा रिक्त झाल्या आहेत.

मात्र, कर्मचारी, अधिकारी नोकरी सोडून गेल्यास त्या ठिकाणी प्रतिक्षा यादीतील उमेदवाराला संधी मिळते. मात्र. पालिकेने नोकरी सोडणाऱ्यांपैकी अनेकजण एक वर्ष पूर्ण करून जात असल्याने प्रतिक्षा यादीतील उमेदवारांनाही संधी मिळत नसल्याने महापालिकेची अडचण वाढली आहे.

### नोकरी सोडणाऱ्यांची आकडेवारी....

- » लिपिक – ३७
- » फायरमन – ८
- » औषध निर्माता – २
- » वाहन निरीक्षक – २
- » कनिष्ठ अभियंता – १०
- » सहाय्यक अतिक्रमण निरीक्षक- ९
- » विभागीय वैद्यकीय अधिकारी -३
- » आतापर्यंतची स्वेच्छा निवृत्ती – १३

# भोसरी मतदारसंघात महायुतीतील शिवसेना आणि भाजपमध्ये बिनसले?..

## आ. महेश लांडगे यांच्या प्रचारापासून शिवसेना उपनेते इरफान सय्यद अलिप्त? त्यांच्या नाराजीचे 'डॅमेज कंट्रोल' भाजपसह पक्षश्रेष्ठी कसे करणार?

**पिंपरी | प्रतिनिधी**

भोसरी विधानसभा मतदारसंघात प्रचार शिगेला पोहोचला आहे. वाटाघाटीत महायुतीचा घटक पक्ष भाजपाला ही जागा सोडण्यात आली आहे. भाजपकडून विद्यमान आमदार महेश लांडगे यांना पक्षाकडून पुन्हा अधिकृत उमेदवारी जाहीर केली आहे. त्या अनुषंगाने आ. महेश लांडगे यांच्याकडून भोसरी मतदार संघात प्रचार सुरु आहे. या प्रचारापासून सध्यातरी महायुतीचा घटक पक्ष शिवसेना (शिंदे गट) कोसो दूर आहे. शिवसैनिकही प्रचारात सक्रीय नाहीत. त्यामुळे भोसरी विधानसभा मतदार संघात महायुतीतील शिवसेना आणि भाजप या दोन घटक पक्षांमध्ये काहीतरी बिनसले आहे? असा सवाल राजकीय जाणकारांकडून उपस्थित होताना दिसतो आहे.

या मतदारसंघात शिवसेना शिंदे गटाची ताकद तसेच कामगार नेते आणि अल्पसंख्याकांचा चेहरा शिवसेना उपनेते इरफान सय्यद यांचा मोठा 'होल्ड' आहे. त्यांचा शिरूर लोकसभा मतदार संघात दांडगा जनसंपर्क आहे. खेड, आळंदी, जुन्नर, शिरूर, भोसरी या भागातील शिवसैनिकांवर त्यांची मजबूत पकड आहे. त्यांची हक्काची अशी 'व्होटबँक' सुद्धा आहे. तरीही ते आ. लांडगे यांच्या प्रचारापासून का अलिप्त आहेत? असा प्रश्न निर्माण झाला आहे.

भोसरी मतदारसंघ हा शिवसेनेचा पारंपारिक बालेकिल्ला मानला जातो. गत २०१९ सालच्या निवडणुकीत शिवसेनेच्या नेत्यांनी आणि शिवसैनिकांनी भाजपचे इमानेइतबारे काम केल्यामुळेच भोसरीत आ. लांडगे यांचा विजय सुकर झाला होता. आ. महेश लांडगे यांच्या विजयात शिवसेनेचा मोठा वाटा होता. त्यानंतर झालेल्या २०१९ सालच्या निवडणुकीत इरफान सय्यद यांनी भोसरी विधानसभेत शड्डू ठोकला होता. भोसरीतून विधानसभा निवडणूक लढविण्याची तयारी केली होती. तत्कालीन पक्षप्रमुख उद्धव ठाकरे त्यांनी त्यांना तसा शब्दही दिला होता. मात्र, जागा वाटपात ही जागा भाजपच्या वाट्याला गेली. आ. महेश लांडगे हेच त्यावेळी भाजपचे उमेदवार होते. इरफान सय्यद यांनी पक्षश्रेष्ठींच्या सांगण्यावरून महेश लांडगे यांना निवडून आणण्यात मोठी भूमिका पार पाडली होती. असे असताना आ. महेश लांडगे यांच्या प्रचारापासून आज ते दूर आहेत. इरफान सय्यद यांच्या नाराजीचे डॅमेज कंट्रोल करून त्यांना प्रचारात सक्रीय करणे गरजेचे आहे. तसे न झाल्यास आ. महेश लांडगे यांच्या मतांच्या बेरजेच्या गणितात मोठी घट होण्याची शक्यता राजकीय जाणकार व्यक्त करीत आहेत.



### निर्णायक बहुमतासाठी शिंदे गटावर अवलंबून रहावे लागणार

» भोसरी मतदारसंघातील राष्ट्रवादी अजित पवार गटातील बहुसंख्य नगरसेवक आणि पदाधिकाऱ्यांनी शरद पवार गटाशी घरोबा केला आहे. त्यामुळे या मतदार संघात महायुतीतील अजित पवार गटाची ताकद क्षीण झाल्याचे चित्र आहे. त्यामुळे निर्णायक बहुमतासाठी आ. महेश लांडगे यांना सर्वस्वी शिवसेना एकनाथ शिंदे गटावर अवलंबून रहावे लागणार आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि इरफान सय्यद यांचे निकटचे संबंध सर्वश्रुत आहेतच. शिवसेनेच्या फुटीनंतर झालेल्या पडझडीत बहुतांशी शिवसैनिक हा शिवसेना उपनेते इरफान सय्यद यांच्या पाठीशी उभा राहिला आहे. ते म्हणतील तीच पूर्वदिशा मानणारा येथील शिवसैनिक आहे. कामगार नेता म्हणुन त्यांच्याशी थेट 'कनेक्टेड' असणारा बहुसंख्य कामगार वर्ग आणि सर्वसमावेशक अल्पसंख्यांक चेहरा, अशी त्यांची जमेची बाजू आहे. त्यामुळे त्यांची नाराजगी दूर होणे आ. महेश लांडगे यांच्या फायद्याचा सौदा आहे. अन्यथा भोसरी मतदारसंघात आ. महेश लांडगे यांना मतांचा दगाफटका सहन करावा लागू शकतो.

# चिंचवड विधानसभा मतदारसंघात चौरंगी लढत?..

**पिंपरी | प्रतिनिधी**

( पान १ वरून )

निवडणुकीत लढण्यासाठी नाही, तर मत विभाजन करून ठरवलेल्या सावजाला पाडण्यासाठी ते उभे राहत असल्याची चर्चा होती. राष्ट्रवादी, शिवसेना ते पुन्हा राष्ट्रवादी असा त्यांचा प्रवास झाला आहे. यादरम्यान त्यांनी शिंदेसेनेशीही हातमिळवणी केली होती. पोटनिवडणुकीत मत विभागणी करण्यासाठी ते उभे राहिल्याचे सांगितले गेले. त्यावेळी त्यांच्यामागे असणारी अदृश्य शक्ती आताही त्यांना इशारा करत होती. त्यामुळे ते महाविकास आघाडीकडून राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाचे उमेदवार ठरले आहेत. धरसोड वृत्तीमुळे त्यांना उमेदवारी देण्यास ठाकरे सेना आणि राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाचे वरिष्ठ नेते इच्छुक नसल्याचे चित्र होते. तिकीट मिळाले नाही तर कलाटे 'वाटाघाटी' करून अपक्ष म्हणून अर्ज भरतील, असाही अंदाज वर्तवला जात होता. मात्र, ते आता खरोखरच उमेदवारीसाठी चिंचवडचा 'डॉर्क हॉर्स' ठरले, असे म्हणायला वावगे ठरू नये.

राहुल कलाटे यांनी २००२ ची महापालिका निवडणूक राष्ट्रवादीकडून लढवली. नंतर ते शिवसेनेत गेले. शिवसेनेने त्यांच्यावर शहरप्रमुखपदाची जबाबदारी दिली. २०१४ मधील विधानसभेच्या निवडणुकीत ते शिवसेनेकडून उतरले. २०१९ मध्ये ते राष्ट्रवादीचे पुरस्कृत उमेदवार होते तर २०२३ मधील पोटनिवडणुकीत ते पुन्हा अपक्ष म्हणून लढले. तिन्ही वेळेस त्यांना पराभूत व्हावे लागले. आता ते शिंदेसेनेसोबत असल्याचे बोलले जात असतानाच शरद पवार गटाकडून त्यांना अधिकृत उमेदवारी मिळविण्यात यश आले आहे. शरद पवार गटाचे शिरूरचे खासदार डॉ. अमोल कोल्हे यांच्याशी असलेल्या जवळीकीचा फायदा त्यांना झाला म्हणायला हरकत नाही.

दरम्यान, भारतीय जनता पक्षाच्या वतीने जाहीर करण्यात आलेल्या उमेदवारांच्या पहिल्या यादीत शहराध्यक्ष शंकर जगताप यांच्या नावाची घोषणा झाली होती. त्यानंतर संपूर्ण चिंचवड मतदारसंघातील भाजपा आणि महायुतीच्या कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले. त्यानंतर कार्यकर्ते उत्स्फूर्तपणे प्रचाराला लागले असून उमेदवारी अर्ज दाखल करण्यापूर्वीच शंकर जगताप यांचा प्रचाराचा पहिला टप्पा पूर्ण झाला आहे. त्यामुळे उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर खऱ्या अर्थाने प्रचाराचा धुराळा उडणार आहे. दिवाळीच्या पहिल्या दिवशी अर्थात वसूबारस दिनाचा शुभमुहूर्त साधून भाजप – शिवसेना – राष्ट्रवादी – आरपीआय – मित्रपक्ष महायुतीचे अधिकृत उमेदवार शंकर जगताप हे सोमवारी (दि. २८ ऑक्टोबर) उमेदवारी अर्ज भरणार आहेत.

राष्ट्रवादी अजित पवार गटाचे जेष्ठ नेते भाऊसाहेब भोईर यांनी निर्धार मेळाव्यात आपल्यावरील अन्यायाचा पाढा वाचला होता. काही झाले तरी लढणारच, असे त्यांनी त्याच वेळी स्पष्ट केले होते. त्यानंतर लगोलग प्रचारास लागून त्यांनी प्रचारात आघाडीही घेतली आहे. दरम्यान लढण्याचा निर्धार कायम ठेवत सोमवारी (दि. २७) रोजी ते आपला उमेदवारी अर्ज ग क्षेत्रीय कार्यालय येथे दाखल करणार आहेत.

राष्ट्रवादी अजित पवार गटाचे माजी नगरसेवक नाना काटे हे देखील अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत. चिंचवड मतदार संघातील कार्यकर्त्यांचा मेळावा घेण्यात आला होता. यामध्ये कार्यकर्त्यांच्या आग्रहाखातर त्यांनी निवडणूक लढविण्याची घोषणा केली होती. सोमवारी (दि. २७) रोजी सकाळी पिंपळे सौदागर येथील महादेव मंदिर पासून सकाळी ९.०० वाजता पदयात्रा काढत रहाटणी मार्गे काळेवाडी मार्गे ग प्रभाग कार्यालय येथे ते अर्ज दाखल करणार आहेत.

# करचोरीतील अडीच लाख मालमत्ता 'रडारवर'

## माहिती न दिलेल्या मालमत्तांचा पिंपरी-चिंचवड पालिकेच्या ड्रोन सर्वेक्षणात लागला शोध

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरातील तब्बल २ लाख ५५ हजारांपेक्षा अधिक मालमत्तांची नोंदणी करण्यात आली नसल्याने महापालिकेचे दरवर्षी कोट्यवधीचे उत्पन्न बुडत होते. सर्वेक्षणात या मालमत्ता रडारवर आल्या असून, त्यांना कर लावण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. परिणामी, महापालिकेच्या तिजोरीत दरवर्षी ३०० कोटी रुपयांपेक्षा अधिकची भर पडणार आहे. शहरात अनेक निवासी व बिगरनिवासी मिळकतींची महापालिकेच्या करसंकलन विभागाकडे नोंदणी करण्यात आलेली नाही.



मालमत्ताकर लागू होऊ नये म्हणून नोंद करण्यात येत नव्हती. त्यामुळे महापालिकेचे दरवर्षी कोट्यवधींचे उत्पन्न बुडत होते. नोंद नसलेल्या मालमत्ता शोधून काढण्यासाठी महापालिकेने प्रत्यक्ष आणि ड्रोनद्वारे शहरात सर्व मालमत्ता आणि मोकळ्या जागेचे सर्वेक्षण केले. करसंकलन विभागाने शहरात १४८ गट तयार केले आहेत. त्यानुसार, प्रत्येक इमारत, घर, मोकळी जागा यांना युपीक आयडी क्रमांक देण्यात आले आहेत.

रेड झोन आणि झोपडपट्टी या दाट लोकवस्तीतही युपीक आयडी क्रमांक देण्यात येत आहेत. सर्वेक्षणात आढलेल्या नोंद नसलेल्या मिळकतींना कर लावण्यात आला आहे. वापरात बदल आणि वाढीव बांधकाम केले असल्यास त्यानुसार कर आकारला जात आहे आकारला जात आहे. नसलेल्या मालमत्ता आढळून आल्या आहेत. त्यात निवासी मालमत्तांची संख्या सर्वाधिक आहे. त्या मालमत्तांना कर लागू केल्याने महापालिकेचे दरवर्षी तब्बल ३०० कोटीने उत्पन्न वाढणार आहे. त्यातून महापालिकेच्या तिजोरीत भर पडणार आहे.

दस्त नोंदणीनंतर मालमत्तेस थेट लागणार नाव

पिंपरी-चिंचवड शहरातील मालमत्तेची खरेदी-विक्री व्यवहाराची दस्त नोंदणी करार नोंदणी व मुद्रांक विभागाकडे झाल्यानंतर तात्काळ महापालिकेच्या करसंकलन विभागाकडे त्या मालमत्तेवर नव्या मालमत्ताधारकांचे नाव लागणार आहे. त्यामुळे नव्याने हस्तांतरण प्रक्रिया करण्याची गरज राहणार आहे. नोंदणीस विलंबही होणार नाही. त्यात महापालिका कर्मचाऱ्यांचा हस्तक्षेप राहणार नाही. त्यामुळे दस्त झालेल्या मालमत्तेची महापालिकेच्या करसंकलन विभागाकडे नोंदणीतून पळवाट काढता येणार नाही. तसेच, मालमत्ताकर चोरी करता येणार नाही.

### यापुढे कर चोरी करता येणार नाही

**» शहरात नियमितपणे ड्रोन सर्वेक्षण करण्यात येणार आहे. त्यामुळे नव्याने निर्माण झालेल्या मालमत्तांची नोंद महापालिकेकडे होणार आहे. हे सर्वेक्षण अचूक असल्याने त्यात मालमत्तेचे मोजमापही उपलब्ध होणार आहे. त्यामुळे नव्या मालमत्तेस कर लागू होणार आहे. त्यामुळे या पुढे कर चोरी करण्यास आळा बसणार आहे, असे महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी सांगितले.**

### महापालिका महसुलात मोठी वाढ होणार

**» शहरात ड्रोनच्या सहाय्याने मालमत्ता सर्वेक्षण सुरू करण्यात आले आहे. शहरातील सर्व मालमत्तांना युपीक आयडी क्रमांक टाकण्यात आले आहेत. आत्तापर्यंतच्या सर्वेक्षणात २ लाख ५५ हजारांपेक्षा अधिक नवीन मालमत्ता आढळून आल्या आहेत. सध्याच्या आणि सर्वेक्षणात आढळलेल्या नवीन अशा सुमारे ८ लाख ७५ हजार मालमत्ता नोंदणीकृत होणार आहेत. यातून महापालिकेला मोठ्या प्रमाणात महसूल मिळणार आहे, असे महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांनी सांगितले.**

# स्व. लक्ष्मणभाऊंचे काळेवाडीच्या विकासाचे अधुरे स्वप्न पूर्ण करणार

## महायुतीचे उमेदवार शंकर जगताप यांचा काळेवाडीकरांना शब्द : ठिकठिकाणी गुलाब पुष्पवृष्टी करून शंकर जगताप यांचे केले जंगी स्वागत

**पिंपरी | प्रतिनिधी**

"लोकनेते स्व. लक्ष्मण जगताप यांचे काळेवाडीकरांवर विशेष प्रेम होते. काळेवाडीतील नागरिकांनीही नेहमीच आम्हाला खंबीरपणे साथ दिली. काळेवाडी प्रभागाचाही इतर गावांप्रमाणे आमूलाग्र विकास करण्याचे त्यांचे स्वप्न होते. मात्र त्यांच्या अकाली जाण्याने त्यांचे हे स्वप्न अधुरे राहिले. त्यामुळे त्यांनी पाहिलेले काळेवाडीच्या सर्वांगीण विकासाचे अधुरे स्वप्न पूर्ण करण्यासाठी यावेळी मला तुमचा आशिर्वाद हवा आहे, असे आवाहन शंकर जगताप यांनी नागरिकांना केले.



चिंचवड विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजप – शिवसेना – राष्ट्रवादी – आरपीआय मित्रपक्ष महायुतीचे अधिकृत उमेदवार शंकर जगताप यांचा काळेवाडी येथे झंझावाती प्रचार दौरा संपन्न झाला. या दौऱ्यात ठिकठिकाणी नागरिकांनी गुलाब पुष्पवृष्टी करून तर महिलांनी औक्षण करून मोठ्या उत्साहात स्वागत केले. यावेळी काळेवाडी प्रभागातील सर्वपक्षीय मान्यवरांसह विविध कॉलनी, सोसायट्या आणि तापकीर नगर वसाहतीतील नागरिकांची भेट घेऊन त्यांच्याशी संवाद साधला. यावेळी "तुमच्या रूपाने आम्हाला पुन्हा एकदा स्व. लक्ष्मणभाऊंचा सहवास लाभल्याचा आभास होत असल्याची", भावना काळेवाडीकरांनी व्यक्त केली.

काळेवाडीचे ग्रामदैवत श्री. ज्योतिबाला नारळ वाढवून प्रचार दौऱ्याचा शुभारंभ झाला. या गाठीभेटीत नवनगर विकास प्राधिकरणचे प्रथम अध्यक्ष बाबासाहेब तापकीर, महापालिकेचे माजी विरोधी पक्षनेते मच्छिंद्र तापकीर, माजी नगरसेवक सुरेश नढे पाटील, माजी स्वीकृत सदस्य नवनाथ नढे, मल्हारी तापकीर, चंद्रकांत तापकीर, माजी नगरसेवक मुरलीधर ढगे, उद्योजक प्रकाश माळेकर, निलेश भोरे, प्रकाश लोहार, दत्ता होले, आतिष कांबळे, श्याम नढे, राजाभाऊ शिंदे, अंबादास भोरे, अनिकेत शिंदे, आबा पाटील, प्रशांत डगवार, रामदास करवे, संजय पाटील, विनायक पिंगळे, अशोक चव्हाण, रावसाहेब देशमुख, संजय दराड, गिरीश देशपांडे, आण्णा गुरव, भिकाजी सावंत, सुदाम खोमणे, दीपक अंकुश,राजू वैराट, बाळासाहेब नढे, दीपक नढे, किरण नढे, शंकर नढे, विलास पाडाळे आदी मान्यवरांच्या निवासस्थानी भेट देऊन त्यांच्याशी संवाद साधला.

यावेळी माजी नगरसेवक प्रमोद ताम्हणकर, माजी नगरसेविका ललिता पाटील, माजी स्वीकृत सदस्य विनोद तापकीर, भाजयुमोचे शहराध्यक्ष तुषार हिंगे, माजी नगरसेवक शैलेश मोरे, बबलू सोनकर, माजी स्वीकृत सदस्य गोपाळ माळेकर, पुणे जिल्हा नियोजन समितीचे सदस्य काळूराम नढे, हरेश तापकीर, शिवसेना शिंदे गटाचे सुनील तात्या पालकर, सामाजिक कार्यकर्ते सोमनाथ तापकीर, रमेश काळे, गोरक्षक समितीचे मंगेश नढे, विलास पाडाळे, विजय सुतार, भाजपा उत्तर भारतीय आघाडीचे आकाश भारती, हर्षद नढे, भरत ठाकूर, उद्योजक बाबासाहेब जगताप, प्रमोद येवले, अमोल भोसले, गणेश कुडुंबळे, कैलास सानप, बजरंग नढे, अविनाश नढे, युवराज नढे, रुद्रराज नढे, प्रमोद मोरे, महेश शिंदे, विशाल सपकाळ, चेतन लष्करे, प्रवीण मोहिते, सुरेश सोनवणे, खंडू आव्हाड यांच्यासह महायुतीचे शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते.

# पुण्यातील कोथरुड मतदारसंघात तिरंगी लढत

## भाजपचे चंद्रकांत पाटील, मनसेचे ॲड. किशोर शिंदे, ठाकरे गटाचे मोकाटे असा रंगणार सामना

**पुणे | प्रतिनिधी**

पुण्यातील कोथरुड मतदारसंघातून भारतीय जनता पक्षाचे अधिकृत उमेदवार चंद्रकांत पाटील आणि मनसेचे ॲड. किशोर शिंदे यांनी उमेदवारी अर्ज भरल्यानंतर ठाकरे गटाकडून कोण उमेदवार असणार याकडे लागले होते. अखेर ठाकरे गटाने चंद्रकांत मोकाटे यांची उमेदवारी जाहिर केली आहे. त्यामुळे कोथरुड मतदारसंघात तिरंगी लढत होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.



विधानसभा निवडणुकीसाठी अर्ज दाखल करण्यासाठी अवघे दोन दिवस राहिले आहेत. निवडणूकीचा आखाडा तापला असून उमेदवारांच्या यादी जाहिर होऊन अर्ज दाखल करण्यास सुरवात झाली आहे. कोथरूड विधानसभा मतदारसंघात आता तिरंगी निवडणूकीचा सामना रंगणार आहे. कोथरुड विधानसभा मतदारसंघ हा भाजपचा बालेकिल्ला आहे. २०१९ चंद्रकांत पाटील या मतदार संघातून निवडून आले होते.

कोथरुड विधानसभा मतदारसंघ महाविकास आघाडीच्या जागा वाटपामध्ये शिवसेना ठाकरे गटाला सुटेल असे मानले जात होते. या मतदारसंघात चंद्रकांत मोकाटे यांच्यासह महापालिकेतील शिवसेनेचे गटनेते पृथ्वीराज सुतार देखील उमेदवारीसाठी इच्छुक होते. तसेच दरम्यानच्या काळात भाजपचे नाराज असलेले माजी नगरसेवक अमोल बालवडकर हे देखील मशाल हातात घेण्याची शक्यता वर्तवण्यात येत होती. मात्र, आता मोकाटे यांचे नाव जाहिर झाल्याने सर्व चर्चांना पूर्णविराम लागला आहे. तिरंगी लढत होणार असल्याने भाजपचे पाटील यांना ही निवडणूकीत ताकद लावावी लागणार आहे.

भाजपकडून पुन्हा एकदा चंद्रकांत पाटील यांना उमेदवारी देण्यात आली आहे. त्यामुळे त्यांना पक्षांतर्गत विरोधाचा सामना करावा लागेल असेही बोलले जात आहे. भाजपचे नेते अमोल बालवडकर हे पक्षाकडून उमेदवारी मिळवण्यासाठी इच्छूक होते. त्यांनी मोठ्या प्रमाणात कार्यक्रमाचा सपाटा लावला होता. मात्र, भाजपने जाहीर केलेल्या पहिल्या उमेदवारीच्या यादीत चंद्रकांत पाटलांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आले होते. मनसेच्या उमेदवारामुळे नेमका कोणाला फटका बसणार आता हे निवडणूकीच्या निकालानंतर समोर येईल.

### कोथरुड मतदारसंघात काय परिस्थिती?

» शिवसेना ठाकरे गटाकडून माजी आमदार चंद्रकांत मोकाटे यांना पुन्हा एकदा कोथरूड मतदारसंघात उमेदवारी देण्यात आली आहे. मनसेकडून ॲड. किशोर शिंदे यांना उमेदवारी देण्यात आली आहे. काँग्रेस आणि राष्ट्रवादीकडे या मतदारसंघात तुल्यबळ नेता नसल्याने पुन्हा एकदा चंद्रकांत मोकाटे यांना उमेदवारी देण्यात आली आहे. या मतदारसंघाच तिहेरी लढत होणार आहे.

# साखर कारखान्यांची धुराडी दिवाळीनंतरच पेटणार!

## आचारसंहिता असल्याने गव्हाणीत मोळी उशिराने पडणार : गळीत हंगाम पूर्ण करण्यासाठी कारखाना प्रशासनाची कसोटी

**पुणे | प्रतिनिधी**

साखर कारखान्यांचा या वर्षीचा गळीत हंगाम लांबणीवर पडणार असल्याने ऊस उत्पादक शेतकरी वर्गाची चिंता आणखीच वाढली आहे. या वर्षीचा शासन निर्णय हा 15 नोव्हेंबरनंतर कारखाने सुरू करण्याचा असल्याने सर्वच कारखान्यांची धुराडी ही उशिरा पेटणार आहेत. परिणामी कारखाना प्रशासनाची गळीत हंगामाची उद्दिष्टे पूर्ण करण्यासाठी मोठी कसोटी लागणार आहे. त्यातच दिवाळीचा सण व विधानसभा निवडणूक येत असल्याने साखर कारखाने सुरू करण्याबाबत हा निर्णय घेतल्याची माहिती एमआरएन भीमा शुगर प्रा. लि. संचालित पाटस कारखान्याचे कार्यकारी संचालक रविकांत पाटील यांनी दिली.



विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता सुरू असल्याने यावर्षीचा बॉयलर अग्नी प्रतिपादन व गव्हाणीमध्ये मोळी टाकण्याचा कार्यक्रम देखील कारखाना प्रशासन स्तरावर करण्यात येणार आहे. गेल्या वर्षी गाळपच्या बाबतीत साखर कारखानदारांना मोठी कसरत करावी लागली होती. यावर्षी देखील अशीच परिस्थिती निर्माण होईल असे दिसत आहे. कारण गुळ गुऱ्हाळ सुरू झाल्याने व त्यातच गळीत हंगाम लांबणीवर पडल्याने गुळ उत्पादक गुऱ्हाळांकडे ऊस उत्पादक शेतकरी वळला आहे.

गेल्या वर्षी पुणे जिल्ह्यातील 19 साखर कारखान्यांपैकी 3 साखर कारखाने हे गळीत हंगामासाठी बंद होते. यामध्ये दौंडमधील अनुराज शुगर्स साखर कारखाना, शिरूरमधील घोडगंगा साखर कारखाना व भोर येथील राजगड सहकारी साखर कारखाना हे गळीत हंगामासाठी चालू झाले नव्हते.

दौंड तालुक्यातील कार्यरत चार साखर कारखान्यांपैकी अनुराज शुगर्स हा कारखाना गेल्या वर्षी चालू झाला नसल्याने दौंड तालुक्यातील असलेले भीमा सहकारी साखर कारखानाचे गाळप 6 लाख 36 हजार 933 मेट्रीक टन इतके झाले तर दौंड शुगर्स साखर कारखानाचे गाळप 18 लाख 1 हजार 877 मेट्रीक टन गाळप झाले तर व श्रीनाथ म्हस्कोबा साखर कारखान्यांचे गाळप 5 लाख 95 हजार मेट्रीक टन झाले.

या तिन्ही कारखान्याचे गाळप 30 लाख 33 हजार 810 मे टन एवढे झाले. यावर्षी दौंड शुगर कारखान्याने 20 लाख मेट्रीक टन गाळप उद्दीष्ट समोर ठेवले असल्याचे संचालक वीरधवल जगदाळे यांनी सांगितले आहे. तर भीमा पाटस 10 लाख मेट्रीक टन गाळप उद्दीष्ट ठेवले आहे.

### बंद कारखान्यांमध्ये भर पडणार का?

» मागील वर्षी जिल्ह्यातील 19 साखर कारखान्यांपैकी 3 साखर कारखाने सुरू झाले नव्हते. मात्र या हंगामाला बंद असलेले साखर कारखाने सुरू होणार की आणखी काही साखर कारखान्यांची बंद साखर कारखान्यामध्ये भर पडणार हे देखील पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

### खरी स्पर्धा 15 नोव्हेंबरनंतरच

» सर्वच साखर कारखान्यांची गळीत हंगामाचे उद्दिष्ट गाठण्यासाठी स्पर्धा 15 नोव्हेंबरनंतरच सुरू होणार आहे. मात्र उसाची स्पर्धा लक्षात घेता कारखान्यांनी वाहतुकीसाठी त्यांच्या स्तरावर कमिशन वाढ गेल्याच वर्षी केली होती. त्यामुळे गुऱ्हाळाला ऊस पुरवठा हा कमी झाला होता. यावर्षी देखील साखर कारखाने आपला समतोल कसा राखतात याकडे लक्ष वेधले गेले आहे.